D.A.V. PUBLIC SCHOOL, THANE

2021-2022

FINAL EXAMINATION

SUBJECT -MARATHI

STD : VIII **MAX MARKS: 80**

DATE: 10/03/2022 **TIME- 3HRS.**

सूचना : प्रश्नपत्रिकेत चार विभाग आहेत .चार विभाग सोडविणे आवश्यक .

विभाग अ = 15 गुण गद्यउतारा

ब = 20 गुण लेखन कौशल्य

क = 20 व्याकरण

ड = 25 पाठ्यपुस्तक आधारित प्रश्न

SECTION -A

प्रश्न 1. खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (8)

व्यायाम ही फक्त मुलांनी आणि तरुणांनीच करायची गोष्ट राहिलेली नाही .कित्येक आजीआजोबा सकाळी बागांमध्ये व्यायाम करायला जमतात ,ही फार छान गोष्ट आहे .वयानुसार स्मरणशक्ती कमी होत जाते .कालपरवा घडलेले आठवत नाही .म्हणजेच अल्पकालीन आठवणीवर परिणाम होत असतो . म्हणून मुलांनी आणि मोठ्यांनीही स्मरणशक्तीसाठी व्यायाम करावा. नियमित व्यायामामुळे हिप्पोकॅम्पमधल्या पेशींना चालना मिळते . हिप्पोकॅम्पस हे स्मरणशक्तीचे केंद्र आहे . व्यायामामुळे हे केंद्र छान ,तरतरीत राहते .'विसरण्या'वर औषध घेण्यापेक्षा हा उपाय नक्कीच चांगला आणि बिनखर्चाचा आहे .

योगासनांमध्ये सांगितलेल्या आसनांच्या विविध पद्धती रोजही वापरता येण्यासारख्या आहेत .अगदी कसे बसावे ,उभे राहावे यासाठी आपण आसनांचा विचार करू शकतो .अगदी लहान वयापासून योगासनांची सवय लावली तर शरीर आणि मन दोन्हींसाठी ते चांगलेच आहे .

प्रश्न 1. बागेत व्यायाम करायला कोण जातात ? 1

2. वयानुसार कोणती गोष्ट कमी होत जाते ? 1

3. स्मरणशक्तीसाठी व्यायाम कोणी करावा ? 2

4. नियमित व्यायामामुळे कोणाला चालना मिळते ? 2

5 अल्पकालीन आठवण म्हणजे काय ? 2

प्रश्न 2.खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (7)

१२ जानेवारी , १८६३ हा विश्वविख्यात स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस . श्री विश्वनाथ दत्त हे त्यांच्या वडिलांचे नाव तर श्रीमती भुवनेश्वरी देवी हे त्यांच्या आईचे नाव होते . विवेकानंदांचे खरे नाव नरेंद्रनाथ दत्त असे होते . ते मुळचे बंगालचे रहिवासी होते .ते रामचंद्र परमहंस ह्यांचे शिष्य होते. स्वामी विवेकानंद हे बालपणापासून दयाळू अंत:करणाचे होते . त्यांचे आचरण अत्यंत पवित्र होते. त्यांना इतिहास, कला ,साहित्य इत्यादी अनेक विषयात रुची होती . १९८४ साली भारत सरकारने राष्ट्रीय युवा दिवस म्हणून त्यांचा जन्मदिवस जाहीर केला आणि त्या वर्षापासून १२ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो .

प्रश्न -1) स्वामी विवेकानंदांचा जन्म कोणत्या साली झाला ? 1

2) स्वामी विवेकानंदांच्या आईचे व वडिलांचे नाव काय ते लिहा ? 1

3) स्वामी विवेकानंदांच्या गुरुंचे नाव काय होते ? 1

4) स्वामी विवेकानंदांना कोणकोणत्या विषयात रुची होती ? 2

5) भारतसरकारने स्वामीजींचा वाढदिवस कोणता दिवस म्हणून जाहीर केला ? 2

SECTION -B

प्रश्न 3.खालील पैकी कोणत्याही एका विषयावर 70 ते 80 शब्दात निबंध लिहा. (8)

1.पिंजऱ्यातील पोपटाचे आत्मवृत्त -- 2. गृहपाठ वहीचे मनोगत 3. सिंधुताई सकपाळ अनाथांच्या आई .....

प्रश्न 4. मुद्द्याच्या आधारे कथा लेखन करा तिला शीषर्क देऊन तिचे तात्पर्य लिहा. (5)

मुद्दे : एक व्यापारी ----त्याची अंगठी चोरीला जाते ------ नोकरांवर संशय ----व्यापारी न्यायाधीशकडे जातो -----न्यायाधीश युक्ती करतो ----------मंतरलेल्या काठ्या ---------चोर सापडतो .

किंवा

मुद्दे : एक सिंह --------- सशाला पकडतो ---------- तेवढ्यात हरिण -------' आपण हरणाला पकडू शकतो .मग छोटासा ससा कशाला हवा ? सशाला सोडतो आणि हरणाच्या मागे धावतो ---- हरिण पळून जाते ----- सिंह पुन्हा सशाला पकडायला मागे येतो ----ससाही पळून जातो ----- सिंहांची निराशा .

प्रश्न 5. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (7)

तुम्ही नवीन शाळेत प्रवेश घेतला आहे ,त्याबद्दल आपल्या ताईला पत्र लिहा . (पत्राखाली लिफाफा आवश्यक)

किंवा

तुमच्या धाकट्या भावाला अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगणारे पत्र लिहा . (पत्राखाली लिफाफा आवश्यक)

SECTION - C

प्रश्न 6. अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा . (6)

1. **सूर्य डोंगरामागे गेला .**
2. **झाडावर फुले आहेत .**
3. **राधा पटपट फुले वेचते .**
4. **एक रुपया म्हणजे शंभर पैसे .**
5. **छे !गरिबांना फसवणे बरे नव्हे .**

प्रश्न 7. वाक्यांचे काळ ओळखा (4)

1. **लवकरच पाऊस पडेल .**
2. **जमीन नांगरावी लागेल .**
3. **पिकांची कापणी झाली .**
4. **मी काम करतो .**

प्रश्न 8. समानार्थी शब्द लिहा. (4)

1. छोटी - 2. सुमन - 3. खडक- 4. कुंज- 5. अंगुली - 6. हस्त -7.मैदान- 8.कथा-

प्रश्न 9. विरुद्धार्थी शब्द लिहा. (2)

1.स्वच्छ x 2. आवश्यक x 3. आकाशx 4. सावध x

प्रश्न 10. शब्दांचे वचन बदला. (2)

1. गोष्ट - 2. रान - 3.नदी - 4. डोळे -

प्रश्न 11. शब्दांचे लिंग बदला. (2)

1.आजोबा - 2. पाहुणा - 3. मांजर - 4. मित्र -

SECTION - D

प्रश्न 12. खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 5) (15)

1. खेळ आपल्याला स्वावलंबी बनवतो व निर्णयक्षमता वाढवतो ,तुमच्या शब्दात लिहा.
2. जिगरबाज भटके शब्दसमूहाचा अर्थ स्पष्ट करा .
3. चंदनाच्या संगे बोरीया बाभळी | हेकळी टाकळी चंदनाची || या ओळींचा अर्थ लिहा .
4. शब्दकोशाचा तुम्हाला कळलेला अर्थ तुमच्या शब्दात लिहा .
5. पोटोबाबद्द्लची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे लिहा .
6. सर्वच प्राणी माणसाच्या प्रेमासाठी भुकेलेले असतात हे विधान पाठाच्या आधारे पटवून द्या.

प्रश्न 13. एका वाक्यात प्रश्नाची उत्तरे लिहा. (कोणतेही-5) (5)

1. बहादुरीच्या कार्यासाठी मिळणारे पदक कोणते ?
2. लेखकाने कलेसाठी वर्णिलेले दोन विषय कोणते ?
3. संत सेना महाराज आजचा दिवस कसा आहे म्हणतात ?
4. 'जन्मापासून आंधळी आहे ती !" हे वाक्य कोणाच्या संदर्भात लिहिले आहे ?
5. झुळूक विसावा केव्हा घेईल ?
6. बचाव अभियान कोणी सुरु केले?

प्रश्न 14. खालील कविता वाचून प्रश्न-उत्तरे लिहा . (5)

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर झुळझुळ झ-याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या ,निळ्या नदीवर शांत खुलवीत मखमली तरंग जावे गात

प्रश्न १ गोड लकेर कोणाची आहे ?

प्रश्न २ झरा कसा वाहत आहे ?

प्रश्न ३ शेत कशाचे आहे ?

प्रश्न ४ नदी कशी आहे ?

प्रश्न ५ समानार्थी शब्द लिहा . १) नदी २) शेत
